**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.०५)**

**सोमवार दिनांक २२ जून २०२६**

**ठळक बातम्या**

1. **विधानपरिषदेच्या ११ जागांपैकी १० जागांवर महायुतीचे उमेदवार विजयी.**
2. **शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या ६ खासदारांचा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश.**
3. **विधीमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाला प्रारंभ; ९७ हजार ७०६ कोटी ४० लाख रुपयांच्या पुरवणी मागण्या सादर.**
4. **'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेच्या विरोधात विदर्भ राज्य आंदोलन समितीच्या वतीनं नागपुरात रास्ता रोको.**

---------------------------------------

विधान परिषद निकाल

विधानपरिषदेच्या अकरा जागांसाठी झालेल्या निवडणुकीचे निकाल आज जाहीर झाले. अकरापैकी दहा जागांवर महायुतीचे उमेदवार विजयी झाले असून नाशिकच्या एका जागेवर अपक्ष उमेदवार विजयी झाला, तर सहा जागांवर महायुतीचे उमेदवार बिनविरोध निवडले गेले, त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रतिनिधींद्वारे निवडल्या जाणाऱ्या विधानपरिषदेच्या द्वैवार्षिक निवडणुकीत १७ पैकी १६ जागा जिंकत महायुतीने दणदणीत विजय मिळवला आहे. महाविकास आघाडीला एकही जागा जिंकता आली नाही. भंडारा गोंदिया मधून अविनाश ब्राह्मणकर, अमरावतीतुन  प्रवीण पोटे, तर नागपूर मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीत भाजपच्या राजीव पोतदार यांनी विजय मिळवला. राजीव पोतदार यांना ६८२ तर काँग्रेसच्या अतुल लोंढे यांना १३० मते मिळाली. हा काँग्रेसच्या नेतृत्वाचा दारुण पराभव असल्याची टीका पोतदार यांनी यावेळी पत्रकारांशी बोलताना केली..

***(होल्ड बाईट - पोतदार - २५ सेकंद)***

अमरावती विधान परिषद निवडणुकीतील पराभवानंतर वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार निलेश विश्वकर्मा यांनी काँग्रेस आणि एमआयएमवर टीका करत विरोधी मतांच्या विभागणीमुळे निकालावर परिणाम झाल्याचा दावा केला. भाजपविरोधी भूमिका घेणाऱ्या एमआयएमच्या काही नगरसेवकांनी भाजप उमेदवाराला मतदान

केल्याचा आरोपही त्यांनी केला. दरम्यान, राज्यात नांदेड मतदारसंघात काँग्रेसमधून भाजपात आलेले अमरनाथ राजुरकर मोठ्या फरकाने विजय झाले. सांगली सातारा मतदारसंघातून भाजपचे धैर्यशील कदम, छत्रपती संभाजीनगर - जालना मधून सुहास शिरसाट, जळगाव मधून नंदकिशोर महाजन, सोलापूरात राजेंद्र राऊत, तर लातूर-बीड-धाराशिव मतदारसंघातून काँग्रेसमधून भाजपात आलेले बसवराज पाटील विजयी झाले. परभणी-हिंगोली मतदारसंघातून शिवसेनेचे सईद खान विजयी झाले. नाशिक मतदारसंघातून भाजप नेते गणेश गिते यांचे बंधू गोकुळ गिते हे अपक्ष म्हणून निवडून आले. या निवडणुकीत ठाणे, रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग, पुणे, यवतमाळ, वर्धा-गडचिरोली-चंद्रपूर आणि अहिल्यानगर या सहा जागांवर महायुतीचे उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत.

---------------------------------------

शिवसेना खासदार प्रवेश

शिवसेनेत प्रवेश करणारे सहाही खासदार जमिनीशी नाळ जोडलेले आहेत. आपल्या मतदारसंघातील लोकांशी बांधिलकी जपणारे आहेत. आपल्या मतदारसंघात विकास झाला पाहिजे अशी त्यांची भावना आहे. त्यामुळे त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला आहे असं प्रतिपादन उपमुख्यमंत्री आणि शिवसेना नेते एकनाथ शिंदे यांनी केलं. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षातल्या  संजय देशमुख, संजय जाधव, नागेश पाटील अष्टीकर, ओमराजे निंबाळकर, संजय दीना पाटील आणि भाऊसाहेब वाकचौरे या ६ खासदारांनी आज शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश केला त्यावेळी ते बोलत होते. आमची शिवसेना ही विचारांशी बांधील असून बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांवर आम्ही चालतो. राज्याचा विकास करण्याची आमची नीती स्वच्छ आहे असंही शिंदे यावेळी म्हणाले. तत्पूर्वी, या खासदारांच्या प्रवेशाच्या मुद्द्यावरुन माजी मंत्री आदित्य ठाकरे यांनी टीका केली आहे. भाजप विरोधी प्रचार करून, महाविकास आघाडीच्या मदतीने हे खासदार जिंकून आले आणि आज लोकांच्या मतांच्या विरोधात जाण्याचं कृत्य करत आहेत असं ठाकरे म्हणाले. दरम्यान, माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे शनिवारपासून ३ दिवस यवतमाळ, वाशिम, हिंगोली, परभणी, धाराशिव आणि शिर्डी या लोकसभा मतदार संघांचा दौरा करणार आहेत. याच मतदारसंघातल्या त्यांच्या पक्षातल्या  खासदारांनी एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश केला आहे.

---------------------------------------

विधिमंडळ

विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाला आज मुंबईत सुरुवात झाली. सुरवातीला विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी नवनिर्वाचित सदस्य सुनेत्रा पवार आणि अक्षय कर्डिले यांना सदस्यत्वाची शपथ दिली. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सन २०२६-२७ च्या पुरवणी मागण्या सादर केल्या. ऐकुया आजच्या विधिमंडळ कामकाजाचा आढावा आमच्या प्रतिनिधींकडून -

***(व्हॉइस कास्ट - आभा पटवर्धन)***

अल निनो प्रभावामुळे नैऋत्य मान्सून पावसाला विलंब झाल्यानं राज्याच्या विविध भागांत पाणीटंचाई निर्माण झाल्याचा मुद्दा काँग्रेस नेते नाना पटोले यांनी सभागृहात उपस्थित केला. त्यावर योग्य चर्चा घडवून आणायचं आश्वासन अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी दिलं. दिवंगत आशा भोसले, सुमन कल्याणपूर, माजी मंत्री अनंतराव थोपटे, विठ्ठलराव धोटे, बळीराम कोटकर-पाटील, कृष्णराव देशमुख, पटल्या मावसकर, वसंतराव सूर्यवंशी, सुरेशकुमार जेथलिया, उषादेवी जगदाळे आणि शकुंतला शर्मा यांना सभागृहाने श्रद्धांजली वाहिली. त्यानंतर सभागृहाचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं. विधानपरिषदेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नवनिर्वाचित सदस्यांचा परिचय सभागृहाला करून दिला. त्यानंतर सन २०२६-२७साठीच्या पुरवणी मागण्या अर्थ राज्यमंत्री आशिष जैस्वाल यांनी सादर केल्या. सभापती राम शिंदे यांनी प्रमोद जठार, कृपाल तुमाने, संजय खोडके, अभिजित वंजारी आणि सुनील शिंदे यांची तालिका सभापतीपदी नियुक्ती केली. त्यानंतर पद्मविभूषण आशा भोसले, पद्मभूषण सुमन कल्याणपूर, माजी आमदार भाऊराव देशमुख आणि सुरेशकुमार जेथलिया यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. त्यानंतर सभागृहाचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं. राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात एकंदर ९७ हजार ७०६ कोटी ४० लाख रुपयांच्या पुरवणी मागण्या आज विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांसमोर सादर करण्यात आल्या. यात सर्वाधिक, २० हजार ५५२ कोटी रुपयांची तरतूद पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेसाठी करण्यात आली आहे. त्याखालोखाल १० हजार ७ कोटी १० लाख रुपयांची तरतूद केंद्र शासनाकडून राज्यांना भांडवली गुंतवणुकीसाठी विशेष सहाय्य योजनेअंतर्गत बिनव्याजी कर्जासाठी केली आहे. विकसित भारत जी-राम-जी योजनेसाठी केंद्र आणि राज्याचा हिस्सा ७ हजार ३६७ कोटी ३२ लाख रुपये इतका आहे, तर सिंहस्थ कुंभमेळ्याचं नियोजन आणि अंमलबजावणीसाठी ३ हजार

कोटी रुपयांच्या निधीची तरतूद आहे. सहकार, पणन आणि वस्त्रोद्योग विभागाच्या २२ हजार १५ कोटी ४२ लाख, नगर विकास विभागाच्या १५ हजार १५२ कोटी ४३ लाख, तर उद्योग, ऊर्जा, कामगार आणि खनिकर्म विभागाच्या १४ हजार ७६० कोटी ४८ लाख रुपयांच्या पुरवणी मागण्यांचा यात समावेश आहे. (आकाशवाणीसाठी वृत्तविभागातून मी आभाराणी पटवर्धन)

---------------------------------------

आंदोलन

राज्य शासनाने २ जून २०२६ रोजी जाहीर केलेली ‘पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना’ ही शेतकऱ्यांची दिशाभूल करणारी आणि फसवी असल्याचा आरोप करत विदर्भ राज्य आंदोलन समितीच्या वतीने आज नागपुरात आंदोलन करण्यात आलं . व्हेरायटी चौकातील गांधी पुतळ्यासमोर झालेल्या आंदोलनात कार्यकर्त्यांनी शासन निर्णयाच्या प्रतीची होळी करून निषेध नोंदविला. शेतकऱ्यांची सरसकट कर्जमुक्ती करण्यात यावी तसेच सातबारा कोरा करण्यात यावा, या प्रमुख मागण्यांसाठी आंदोलनकर्त्यांनी सरकार विरोधात जोरदार घोषणाबाजी केली. आंदोलनादरम्यान काही कार्यकर्त्यांनी रस्त्यावर उतरून बससमोर झोपत रास्ता रोको करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे काही काळ वाहतुकीवर परिणाम झाला. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांनी तत्काळ हस्तक्षेप करत रास्ता रोको करणाऱ्या आंदोलनकर्त्यांना ताब्यात घेतलं.

---------------------------------------

लोकवर्गणीतून बोअरवेल

अमरावती जिल्ह्यातील मेळघाटातील बोरधा गावातील ग्रामस्थांनी पिण्याच्या पाण्याच्या तीव्र टंचाईवर मात करण्यासाठी लोकवर्गणीतून बोअरवेल खोदण्याचा उपक्रम राबविला आहे. प्रशासनाकडून दखल घेतली जात नसल्याचा आरोप करत ११० कुटुंबांनी प्रत्येकी अडीच हजार रुपये जमा करून २ लाख ७५ हजार रुपयांचा निधी उभारला. साडेसहाशे फूट खोदकाम केल्यानंतर अखेर पाण्याचा स्रोत सापडला. काही ग्रामस्थांनी यासाठी दागिने गहाण ठेवणे, उसनवारी करणे आणि बकरी विकणे अशा मार्गांनी आर्थिक योगदान दिलं.

---------------------------------------

दत्तात्रय भरणे

गोंदिया जिल्ह्यात नवीन शासकीय कृषी महाविद्यालय स्थापन करण्यासह कृषी विकासाशी संबंधित सर्व प्रस्तावांवर तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिले. मंत्रालयात झालेल्या बैठकीत त्यांनी शेतकऱ्यांना दर्जेदार बियाणे, खते आणि आधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यावर भर दिला. यावेळी खत विक्रीतील अनियमितते विरोधात राज्यभर सुरू असलेल्या कारवाईची माहिती देताना त्यांनी आतापर्यंत ५५ विक्रेत्यांचे परवाने रद्द, तर ८३३ परवाने निलंबित करण्यात आल्याचं  सांगितलं. तसेच युरिया खताच्या काळाबाजारा विरोधात कठोर कारवाई सुरू असल्याचंही स्पष्ट केलं.

---------------------------------------

हवामान

विदर्भात नागपूर सह वर्धा,  चंद्रपूर आणि अमरावती या जिल्ह्यांमध्ये आज, उद्या आणि परवा उष्णतेच्या लाटेचा ऑरेंज अलर्ट  जारी करण्यात आला असून अकोला, यवतमाळ आणि गडचिरोली या जिल्ह्यांमध्ये उष्णतेचा  यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. दरम्यान दुपारपासून नागपुरात ढगाळ वातावरण आणि अधून मधून पावसाच्या हलक्या सरी वर्षाव करत असल्यामुळे तापमानात किंचित घट झाली आहे. तत्पूर्वी, गडचिरोली शहरासह जिल्ह्याच्या विविध भागात आज दुपारनंतर मेघगर्जना आणि विजांच्या कडकडाटासह पावसाच्या जोरदार सरी बरसल्या. दुपारपर्यंत कडक उन्ह होते. मात्र साडेतीन वाजतानंतर हवामानात बदल होऊन पाऊस पडला. यामुळे नागरिकांना उकाड्यापासून दिलासा मिळाला. दरम्यान, नैऋत्य मोसमी पाऊस उद्यापासून राज्यातल्या काही भागांत सक्रिय होण्यासाठी परिस्थिती अनुकूल झाली असल्याचं हवामानविभागानं सांगितलं आहे. आज सकाळी मुंबईतील काही भागांत जोरदार पाऊस झाला, तर ठाणे जिल्ह्यातही बहुतांश ठिकाणीपावसानं हजेरी लावली. येत्या २४ तासांत राज्यातील तुरळक ठिकाणी हलका ते मध्यम पाऊस, तर काही भागांत मेघगर्जनेसह वादळीपावसाची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे.

---------------------------------------